# प्रवेश देणे चालु आहे

*वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्न*

# कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लातूर

## महाविद्यालय कोड 18200

B.Sc. (Hon's) Agri.B.M. या पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्यासाठी सुवर्ण संधी.

**आजच आपला प्रवेश निश्चित करा.**

**प्रवेश फेरी दि. 28 ते 31 अगस्ट 2023**

महाविद्यालय स्तरावर व **व्यवस्थापन कोठ्यातून** प्रवेश देणे चालू आहे.

महाविद्यालयाच्या जागेचे तपशील.

| Category | Special Category | Quota Type | Gender Type | Vacancies |
|---|---|---|---|---|
| OPEN | GEN | M | F | 1 |
| OPEN | GEN | M | B | 7 |
| VJ(a) | GEN | M | B | 1 |
| OPEN | GEN | U | F | 1 |
| OPEN | GEN | U | B | 17 |
| OBC | GEN | U | B | 1 |
| CO | GEN | U | B | 33 |
| CO | GEN | M | B | 16 |

**पात्रता :** 12 वी विज्ञान ऊतीर्ण (Open :- 50% , Cateogry:- 40% Marks )

आणि MH-CET/NEET/JEE (2023) APPEAR किंवा राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केलेले अंतीम गुनवत्ता यादीतील उमेदवार

*अधिक माहितीसाठी संपर्क :-, 8668423750, 8806386364, 9421695448*

*पत्ता :- प्लॉट नं. 07, अतिरिक्त एम.आय.डी.सी. हरंगुळ रेल्वे स्टेशन जवळ, बार्शी रोड, लातूर*

प्राचार्य
कृषी व्यवसाय व्यवस्थापन
महाविद्यालय लातूर

cet cell 2023-24

# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

वाचा:- कृषी व पदुम विभाग, अधिसूचना दि.१४/०८/२०२३

जा.क्र. रासाप्रपक/कृशिप्र/१३२३/मकृशिसंपपुणे/संस-मविस/१७६५ दि. २६ ऑगस्ट,२०२३

### परिपत्रक

**विषय:- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**
**महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी राबविणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.२४/०६/२०२३ पासून सुरु झालेली आहे. याअंतर्गत नियोजित वेळापत्रकानुसार तीन ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्या राबविण्यात आलेल्या आहेत. केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीकरिता १३ प्रवेश प्रक्रिया केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले असून सदरची फेरी दि. २१/०८/२०२३ ते दि. २६/०८/२०२३ या कालावधीत राबविण्यात येत आहे. तसेच दि.२२/०८/२०२३ ते ३१/०८/२०२३ पर्यंत (पुनर्सुधारीत वेळापत्रक दि.१७/०७/२०२३ नुसार) संस्थात्मक कोटयातील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. याबाबतची कार्यपध्दती प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे प्रक्रिया राबवावी.

कृषी व पदुम विभाग, अधिसूचना दि.१४/०८/२०२३ अन्वये केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी पूर्ण झाल्यानंतर रिक्त असलेल्या जागा प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांक (कट ऑफ डेट) पर्यंत महाविद्यालयस्तरावर भरण्यासाठी 'महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी'ची तरतूद करण्यात आलेली आहे.

**यास्तव दि.२८ ते ३१ ऑगस्ट,२०२३ या कालावधीत 'महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी' राबविण्यात येत आहे.**

प्रवेशोच्छुक उमेदवार तसेच संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य किंवा सहयोगी अधिष्ठाता यांनी महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीबाबत खालीलप्रमाणे बाबी विचारात घेऊन कार्यपध्दती अवलंबवावी.

१. कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात उमेदवार प्रवेशित नसावा.

२. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवार तसेच प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांक (कट ऑफ डेट) पर्यंत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या

Inward No. 295
Outward No.
Date 28/8/23

www.mahacet.org या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल केलेले पात्र उमेदवार महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीसाठी पात्र असतील. अशा उमेदवारांनी त्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाकडे देखील अर्ज करावा.

३. www.mahacet.org हया संकेतस्थळावर रिक्त जागांचा तपशील उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात **दि.२८/०८/२०२३ ते ३१/०८/२०२३ या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे. **प्रवेश प्रक्रिया दुपारी ४.०० पर्यंतच चालू असेल.**

४. उपलब्ध जागांवरील प्रवेश हे पारदर्शक रितीने आणि ज्यांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पडताळणीसाठी व नंतर महाविद्यालयाकडे / संस्थेकडे प्रवेशासाठी अर्ज सादर केलेले आहेत, अशा सर्व उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार करावेत व **महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे प्रवेश दिल्याची नोंद करावी.**

५. प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल अशा रीतीने महाविद्यालयाची / संस्थेची माहिती व प्रवेशाचे नियम विनिर्दिष्ट केलेले असतील, अशी पुस्तिका किंवा निर्देश पुस्तिका प्रकाशित करावी. माहिती पुस्तिकेतील सर्व माहिती महाविद्यालयाच्या / संस्थेच्या संकेतस्थळावर देखील प्रदर्शित करण्यात यावी.

६. प्रत्येक महाविद्यालय / संस्थेने प्रवेशाचे वेळापत्रक आणि त्यांच्याकडून प्रत्येक पाठ्यक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या, यांची जाहिरात त्यांच्या संकेतस्थळावर आणि सक्षम प्राधिकारी यांचे संकेतस्थळावर, त्यांनी निश्चित केलेले शुल्क भरून अधिसूचित करावी व आवेदनपत्र मागवावे आणि महाविद्यालयाच्या / संस्थेच्या सूचना फलकावर देखील प्रसिध्द करावे. तसेच कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी., संबंधित कृषी विद्यापीठाकडे पाठवावे.

७. संस्था / महाविद्यालयाने, संस्थास्तरीय कोटयातील जागा, महाविद्यालयस्तरीय रिक्त जागा व वरीलप्रमाणे प्राप्त प्रवेश अर्जांची गुणवत्ता यादी, संस्थेच्या / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करावी.

८. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधील रिक्त जागा ज्या प्रवर्गाची आहे, त्या प्रवर्गाच्या उमेदवारांमधूनच ती जागा भरण्यात यावी. तद्नंतरही जागा रिक्त राहिल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.३१/०८/२०२३ रोजी विहित पध्दतीने (शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रवेश कार्यपध्दतीने) जागा रूपांतरीत करून भरण्यात याव्यात.

९. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जात / जमाती पडताळणी प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र ही प्रमाणपत्रे दि. १८/८/२०२३ हया मुदतीत निर्गमित झालेली असावीत. यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य नसतील.

१०. प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवाराची मूळ कागदपत्रे तपासून ते बरोबर असल्याची महाविद्यालयाने खातरजमा करावी.

११. महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी व संस्थात्मक कोटयातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांकडून रु.१०००/- 'जागा स्वीकृती शुल्क' महाविद्यालयांनी प्राप्त करावे व प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये दिलेल्या सूचनाप्रमाणे सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावे.

१२. महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी व संस्थात्मक कोटयातील जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय असणार नाही. याची माहिती महाविद्यालयांनी / संस्थांनी संबंधित प्रवेशोच्छुक उमेदवारास द्यावी. सदरील उमेद्वार शिष्यवृत्ती मागणार नाही, असे हमी पत्र उमेदवाराकडून लेखी स्वरूपात घेण्यात यावे.

सर्व संबंधितांनी कृपया वरील बाबींची नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

स्वाक्षरीत/-
आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई